# सदानंद बोरकर यांना राज्यस्तरीय 'कलावंत पुरस्कार' घोषित

**नवरगाव** : नाट्यक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सदानंद बोरकर यांना राज्यस्तरीय कलावंत पुरस्काराने सम्मानित करण्यात येणार आहे.

माझं कुंकू मीच पुसलं !, आत्महत्या, नवरे झाले बावरे, अस्सा नवरा नको गं बाई आणि गंगाजमुना या सामाजिक नाटकाचं त्यांनी लेखन आणि दिग्दर्शक केलेलं असून, सर्वच नाटकांमधून त्यांनी भूमिकाही केल्या आहेत. ३१ मार्चला नाशिक येथील आयएमए हॉल येथे समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. नाशिक येथील सामाजिक कलावंत विचारमंत संस्था आणि कमल फिल्म प्रोडक्शनच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही लोककवी वामनदादा करडक,



कवी वसंत बापट, शाहीर अमर शेख, दादासाहेब फाळके यांच्या जयंतीनिमित्त कवियत्री बहिणाबाई चौधरी स्मृतिदिनाचे औचित्य साधून कलावंत, लोककलावंत, लेखक, कवी, बाल कलावंत, वादक, छायाचित्रकार, शाहीर, नाटककार, शास्त्रीय गायन आणि संगीत, गायक, चित्रपट दिग्दर्शक, डॉक्युमेंटरी फिल्म, टेलिफिल्मचे निर्माते, दिग्दर्शक आणि कलावंत यांना सन्मानित केले जाणार आहे. हैदराबाद येथील चित्रपट दिग्दर्शक सत्यनारायण जाधव यांना राष्ट्रीय पुरस्काराने तर विविध क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या १५ कलावंतांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.